॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 **OFFICE OF THE DIRECTOR OF EXAMINATIONS & EVALUATION** website: srtmun.ac.in

**Phone: (02462) 215294** **E-mail: directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र. परीक्षा/समन्वय/२०२५-२६/६०१९ दिनांक :१२/०८/२०२५

## परीक्षा केंद्रासंबंधीचे महत्वाचे परिपत्रक

प्रति,
मा.प्राचार्य/केंद्रप्रमुख,
उन्हाळी-२०२५ च्या परीक्षेतील परीक्षा केंद्रे,
प्रस्तुत विद्यापीठ.

विषय : हिवाळी-२०२५ च्या परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे व इतर सोई सुविधा बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी-२०२५ च्या पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे परीक्षा केंद्र ज्या महाविद्यालयात देण्यात आलेले होते त्या महाविद्यालयामध्ये मा.व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार हिवाळी-२०२५ मधील सर्व परीक्षा CCTV कॅमेरेच्या देखरेखीखाली होणार आहेत. त्यामुळे ज्या महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर खालील प्रमाणे CCTV कॅमेरे व इतर आवश्यक सोई सुविधा अद्याप उपलबध नाहीत अशा महाविद्यालयाच्या सदर परीक्षा केंद्रावर CCTV कॅमेरे व त्या अनुषंगाने लागणा-या सोई सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी होणा-या एकुण खर्चाच्या ५० % खर्च अथवा रु. ४००००/- यापैकी जो खर्च कमी असेल ती रक्कम/खर्चाची अदायगी विद्यापीठाव्दारे करण्यात येणार आहे.

प्रस्तुत विद्यापीठाच्या हिवाळी-२०२५ च्या पदवी, पदव्युत्तर व व्यावसायिक परीक्षेपुर्वी खालील सोई सुविधा आपल्या महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर असणे बंधनकारक आहे.

१) परीक्षा केंद्रावर कॅमेरे (हॉल, पोर्च, परीक्षा कक्ष व स्ट्रॉंग रूम) बसविणे बंधनकारक आहे.

२) CCTV कॅमेरे विद्यापीठाने ठरवून दिलेल्या विशिष्ट विकाणी असणे आवश्यक आहे.

३) सर्व CCTV चे प्रक्षेपण महाविद्यालयाच्या /परीक्षा केंद्राच्या नियंत्रण कक्षामध्ये दिसणे बंधनकारक आहे.

४) परीक्षेच्या कालावधीदरम्यानचे चित्रिकरण स्टोअर करणे आवश्यक आहे, यासाठी HD तसेच क्लाऊड बेस सुविधा वापरणेही बंधनकारक आहे. सदरील चित्रिकरण संबंधीत परीक्षाचा निकाल जाहिर होईपर्यंत जतन करणे बंधनकारक आहे.

५) विद्यापीठाच्या नियंत्रण कक्षाकडून दिलेल्या सूचना स्विकारण्यासाठी व अमलबजावणीसाठी द्रकश्राव्य माध्यम (उदा. हेडफोन, माईक, स्पीकर्स इत्यादी) PA-address System असणे आवश्यक आहे.

६) CCTV च्या ऐवजी IP base Technology वापरण्याची मुभा राहील. परंतु वरील मुद्दे क्र. २ ते ५ ची पुर्तता होणे गरजेचे आहे.

७) ज्या महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावर उपरोक्त सोई सुविधा उपलब्ध नसतील तेथे सदर सोई सुविधा करणे बंधनकारक आहे त्याकरीता विद्यापीठाच्या खालील निर्णयानुसार अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

"मा.व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ८/२/२०२५ रोजी बै.क्र. १०६ विषय /ठराव क्र. ४ नुसार सर्व परीक्षा केंद्रावर **CCTV** कॅमेरे बसविणे व त्यावरच्या खर्चाचे दोन भाग करून खर्चाच्या ५० % खर्च विद्यापीठामार्फत परीक्षा केंद्राच्या महाविद्यालयास देण्यात यावा असा ठराव पारित करण्यात आलेला आहे. एकुण खर्चाच्या ५० % खर्च अथवा रू. ४००००/- यापैकी जो खर्च कमी असेल त्याची अदायगी करण्यात येईल".

८) ज्या महाविद्यालयामध्ये परीक्षा केंद्राची मान्यता आहे अशा सर्व महाविद्यालयांनी आपल्या परीक्षा केंद्रावर **CCTV** कॅमेरे बसविले नसल्यास उपरोक्त प्रमाणे हिवाळी-२०२५ च्या परीक्षेपूर्वी सर्वोत्परी कार्यवाही करावी तरच त्यांचे परीक्षा केंद्र कायम कार्यान्वीत करण्यात येईल, अन्यथा सदर महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

९) महाविद्यालयांनी **CCTV** बसविलेले देयक **Installation** अहवाल प्राचार्यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाच्या परीक्षा विभागास सादर करावे, अहवाल दिल्यानंतर नियमानुसार शिफारस केलेल्या रक्कमेची अदायगी करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सविस्तर माहितीसाठी सोबत **CCTV** कॅमे-याचे **Specification** सुलभ संदर्भासाठी जोडलेले आहे. सबब उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून अहवाल दिनांक ३०/०९/२०२५ पर्यंत सादर करावे ही विनंती. **CCTV** संबंधीत साहित्य खरेदीची देयके सादर करतांना खालील बाबीची पुर्तता करणे आवश्यक आहे.

१) **CCTV Set up** चे **Geo tag** फोटो.
२) **CA** कडून खर्चाची **UC**, देयकांची एक प्रत.
३) **Exam. Committee Visit** अहवाल (**CCTV** बसविणे बाबत).
४) **Exam. CCTV Nodal Officer** चे **Live Streaming** विद्यापीठाच्या यंत्रणेत दिसत असल्याचे प्रमाण पत्र.
५) परीक्षा विभागाचे देयके मंजूर करण्याबाबतची शिफारस.

प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव :
मा.कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा. प्र-कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.वित्त व लेखाधिकारी, प्रस्तुत विद्यापीठ.
मा.अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.